


एक आशेचा किरण

# स्नेहवन वार्ता

मे २०२४

संपादन व मार्गदर्शन : नयना निर्गुण
संकलन व लेखन : श्रीकांत, वैभव, दीपक

या सुखांनों साद घालु
दु:खितांच्या जिवनी...
फुल नाही तर पाकळी होवू।
दु:खितांच्या जिवनी सुगंध देवू।।

वेबसाईट- www.snehwan.in | फेसबुक- www.facebook.com/snehwan | Instagram- www.instagram.com/ashok.snehwan | पत्ता : स्नेहवन, कोयाळी फाटा, कोयाळी फॉरेस्ट, कोयाळी तर्फे चाकण, ता. खेड, जि. पुणे - ४१०५०१

# सिनेमा, सहल, खेळणी...
# उन्हाळी सुटीत मुलांसाठी पर्वणी!



वार्षिक परीक्षा संपल्या, शाळांना सुटी लागली. मुलांना आता खेळायला काहीतरी वेगळे हवे असते. 'स्नेहवन'मधील मुलांसाठी सुटीत असेच वेगळे उपक्रम राबविले जातात, जे त्यांना सुटीचा आनंद तर देतातच, पण त्यांच्या बुद्धीला चालना देतात, त्यांच्या सामान्यज्ञानात भर घालतात. या उपक्रमांनी त्यांचा उत्साह वाढतोच, शिवाय त्यांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी नवी ऊर्जाही मिळते.

## 'स्वातंत्र्यवीर सावरकर'मधून देशभक्तीची प्रेरणा



स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनावरील चित्रपट सध्या गाजतोय. भारताला स्वातंत्र्य मिळावे, यासाठी सावरकरांनी केलेले प्रयत्न, त्यांचे योगदान याची गोष्ट हा चित्रपट सांगतो. मुलांना चित्रपटगृहात हा चित्रपट दाखविला.

संस्थेतून निघतानाच हा चित्रपट पाहायला मिळणार म्हणून मुले इतकी उत्तेजित झाली होती की, चित्रपटगृहाबाहेर गाडीतून उतरताच त्यांनी जोरजोरात वीर सावरकर यांच्या नावाचा जयघोष केला. वंदे मातरमच्या घोषणा द्यायला सुरुवात केली. मुलांना सिनेमा खूप आवडला. देशप्रेम काय असते, आज जे आपण स्वातंत्र्य उपभोगतोय, त्यासाठी क्रांतिकारकांनी काय योगदान दिले, किती त्याग केला, हे पाहून मुले भारावून गेली. हा चित्रपट मुलांना दाखवण्यासाठी शर्मिलाताई महाजन, सचिन बोधानी आणि सावरकर मंडळ, दादर यांचे सहकार्य लाभले.

## संभाजी महाराजांच्या समाधीचे तुळापुरात दर्शन

छत्रपती संभाजी महाराजांची समाधी असलेल्या तुळापूर येथे मुलांची सहल नेण्यात आली. मुलांनी तेथे छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. सर्व मुलांनी जोरात घोषणा देत संभाजी महाराजांच्या बलिदानाचे स्मरण केले.

याच ठिकाणी भीमा, भामा आणि इंद्रायणी या तीन नद्यांचा संगम झाला आहे. त्रिवेणी संगम पाहण्याचा आनंदही मुलांनी लुटला.







## मनसोक्त खेळण्यासाठी टॉय लायब्ररी

नवनवीन खेळ मुलांना नेहमीच आकर्षित करतात. त्यातूनच अनेक खेळाडूही घडतात. स्नेहवनमधील मुलेही याला अपवाद नाहीत. त्याकरताच संस्थेत मुलांसाठी टॉय लायब्ररी सुरू करण्यात आली आहे.

या लायब्ररीच्या माध्यमातून मुलांना विविध खेळाचा आनंद घेता येणार आहे. या लायब्ररीत बुद्धिबळापासून क्रिकेटपर्यंत सर्व खेळांचे साहित्य मुलांना खेळण्यासाठी उपलब्ध आहेत. उन्हाळी सुटीत मुलांना हे खेळ मनसोक्त खेळता येणार आहेत.

पिंपरी चिंचवडचे उपायुक्त नीलेश भदाने यांच्या हस्ते टॉय लायब्ररीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी श्री. भदाने यांनी मुलांना मार्गदर्शन केले. स्वतःचा जीवन प्रवास त्यांनी मुलांसमोर उलगडला. मुलांनीही मनमोकळेपणाने प्रश्न विचारत सरांशी संवाद साधला.



## 'लोकमत' कार्यालयाला भेट

वर्तमानपत्र तर रोजच पाहतो, पण त्याचे काम कसे चालते, याची माहिती 'स्नेहवन'मधील बालगोपाळांनी घेतली. त्याकरता लोकमत वृत्तपत्राच्या पिंपरी चिंचवड येथील कार्यालयाला मुलांनी भेट दिली.

संपादकीय विभागातील सहकाऱ्यांसह स्वतः संपादकांनी मुलांचे स्वागत केले. त्यांना पत्रकारितेबद्दल माहिती दिली. त्याचे विविध पैलू समजावून सांगितले. त्यानंतर वृत्तपत्राची पाने कशी लावतात (पेज लेआउट), प्रिंटिंग कसे केले जाते, याची सविस्तर माहिती दिली. आपण वृत्तपत्रात जी बातमी वाचतो ती कोण, कोठून मिळवते, याची मुलांना उत्सुकता होती. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे त्यांना या भेटीत मिळाली. 'लोकमत'चे पत्रकार ज्ञानेश्वर भंडारे यांच्या पुढाकाराने हा योग जुळून आला.



एक आशेचा किरण
स्नेहवन वार्ता

मे २०२४

# दारी गुढी उभारून दिल्या नववर्षाच्या शुभेच्छा

मराठी नववर्षाचा पहिला दिवस चैत्र प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा 'स्नेहवन'मध्ये उत्साहात साजरा झाला.

सकाळपासूनच मुलांची लगबग सुरू होती. सर्व मुले लवकर उठली, अंघोळ करून तयार झाली. सर्वांनी नवीन कपडे घातले होते. सगळ्यांनी एकत्र येऊन गुढी उभारण्याची तयारी सुरू केली.

सूर्योदयानंतर गुढी उभारण्यास सुरुवात झाली. बांबूच्या उंच काठीला रेशमी वस्त्र गुंडाळले, फुलांचा हार, साखरेची गाठी, कडूनिंबाची डहाळी बांधून त्यावर तांब्या ठेवला. ही गुढी 'स्नेहवन'च्या दारात पाटावर उभारली. सर्व मुलींनी गंध, फुले, अक्षता वाहून पूजा केली. ग्लोबल क्लासरुम उपक्रमांतर्गत परदेशातून आलेली अना हिनेही गुढीची पूजा केली. सर्वांनी एकमेकांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. सायंकाळी गोडाचा नैवेद्य दाखवून, पूजा करून गुढी उतरविण्यात आली.



## राम रंगी रंगले

गुढीपाडव्यानंतर नवव्या दिवशी रामनवमी 'स्नेहवन'मध्ये राम नामाचा गजर करून साजरी करण्यात आली.

सर्व मुले सकाळी लवकर उठून, अंघोळ करून, गंध लावून पटांगणात आली. सगळ्यांनी एकत्र बसून रामाचे भजन म्हटले. राम नाम घेत प्रभू श्रीरामाचे स्मरण केले. राम कृष्ण हरी म्हणत नाचून राम जन्माचा आनंद लुटला. सर्व जण रामनामात रंगून गेले होते.



# डॉ. आंबेडकर जयंतीदिनी वाचनाचा उपक्रम

'स्नेहवन'मध्ये सगळे उत्सव, तसेच महापुरुषांची जयंती, पुण्यतिथीनिमित्त विविध उपक्रम आयोजित केले जातात. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मुलांनी वाचनाचा उपक्रम राबवून साजरी केली. मुलांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनचरित्र, त्यांचे कार्य, त्यांनी देशासाठी दिलेले योगदान याविषयीच्या पुस्तकांचे वाचन केले.

रात्री हरिपाठ आणि प्रार्थना झाल्यांनतर सर्व मुले आणि 'स्नेहवन'च्या सर्व सदस्यांनी एकत्र येऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर सुमारे तासभर चाललेल्या या कार्यक्रमात काही मुलांनी भाषण केले. श्रीकांत याने मुलांना डॉ. आंबेडकरांबद्दल माहिती सांगितली. संस्थेचे संस्थापक अशोक देशमाने यांनी मुलांना मार्गदर्शन केले.



# दातांच्या निगेबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

इंडियन डेंटल असोसिएशनच्या माध्यमातून 'स्नेहवन'मधील बालगोपाळांसाठी दंत तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

'स्नेहवन'मध्ये दर १५ ते २० दिवसांनी आरोग्य शिबिर घेतले जाते. या महिन्यात मुलांच्या दातांची तपासणी केली गेली. या शिवाय दातांची निगा कशी राखावी, दात कसे घासावे, याविषयी तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. डॉ. प्रशांत गावडे, डॉ. मंजिरी जोशी, डॉ. सुप्रिया पाटील- गणेशवाडे, डॉ. गायत्री मोरे, डॉ. चैताली भंडारी यांनी या शिबिरासाठी वेळ दिला.





# मुलांनी जाणून घेतले आयटी कंपनीचे काम

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील (आय़टी) कंपन्यांचे काम कसे चालते, याविषयी मुलांच्या मनात उत्सुकता होती. आयटी कंपनी पाहण्याची त्यांची इच्छा होती. त्यामुळेच त्यांना पुण्यातील आयसर्टिस (Icertis) ही कंपनी दाखविण्यात आली. या कंपनीचे काम कसे चालते, हे पाहण्याची संधी मुलांना मिळाली.

आयसर्टिस कंपनीत गेल्यानंतर मुलांनी त्यांचे कार्यालय पाहिले. या कंपनीत काम कसे चालते, याची माहिती घेतली. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी मुलांना चॅट-जीपीटीबद्दल माहिती सांगितली. चॅट- जीपीटी म्हणजे काय, त्याचे फायदे काय, तोटे काय या प्रश्नांची उत्तरे मुलांना मिळाली. कंपनीचे संपूर्ण ऑफिस मुलांनी फिरून पाहिले.






'स्नेहवन'मधील श्रीकांत, दीपक आणि वैभव यावर्षी बी.सी.ए.ची (Bachelor in computer application) चौथ्यासेमिस्टरचीपरीक्षादेतआहेत.परीक्षासध्यासुरूआहे. हे तिघे गेल्या नऊ वर्षांपासून स्नेहवनमध्ये राहून शिकत आहेत. यावर्षी त्यांचे पदवीचे दुसरे वर्ष पूर्ण होईल. काही वर्षांपूर्वी शिक्षण थांबण्याच्या मार्गावर असणारी ही मुले आज यशाची नवनवीन शिखर चढत आहेत. संस्थेतील बाकी मुलांना यांच्याकडे बघून जिद्दीने शिकण्याची प्रेरणा नक्कीच मिळेल.